http://www.sgbauonline.com

AT-1282

## B.Com. (Part—II) Examination
## MARATHI (Compulsory)
## (Languages)

वेळ : दोन तास] [एकूण गुण : 35

1. 'मानवी प्राण्यांत मूळ जातिभेद नाही', असे महात्मा फुले यांनी का म्हटले आहे ?

**किंवा**

'आता कुंपणे नकोत' असे विनोबा भावे यांना का वाटते ? 6

2. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी श्री. म.माटे यांनी कोणते विचार मांडले आहेत ?

**किंवा**

निरंजन घाटे यांच्या मते पर्यावरणाच्या असमतोलासाठी कोणते घटक कारणीभूत आहेत ? 4

3. 'माणुसकीच्या मर्यादा' या पाठातून लेखकाने माणुसकीचे दर्शन कसे घडवले आहे, ते सांगा.

**किंवा**

'अरणी' या कथेतील वुडस्चे व्यक्तिचित्र रेखाटा. 6

4. 'तू जो आभ्यास करशील, संशोधन करशील, त्याचा रस्त्यावरच्या सामान्य माणसाला उपेग होनार नसेल तर ते सगळं झूठ हाय' असे नरेंद्र जाधव यांच्या वडलांनी का म्हटले आहे ?

**किंवा**

'वाहणाऱ्या पाण्यासारखं गणपतचं मन मला स्वच्छ वाटलं !' असे लेखक मधुकर वाकोडे का म्हणतात ? 4

5. विभाग 'अ' किंवा 'ब' यापैकी कोणताही एका विभाग पूर्ण सोडवा :

**विभाग 'अ'**

(1) संत एकनाथ यांच्या 'दादला' या कवितेचा रूपकात्मक अर्थ स्पष्ट करा.

(2) संत तुकारामांनी प्रापंचिकांना कोणता उपदेश केला आहे ?

**किंवा**

**विभाग 'ब'**

(1) 'उषःकाल होता होता काळरात्र झाली !' असे सुरेश भट यांनी का म्हटले आहे ?

(2) 'ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे' असे ना.धों. महानोर का म्हणतात ? 8

6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :

(1) नोटाबंदी : प्रक्रिया आणि अंमल

(2) संगणक साक्षरता आणि आजचा युवक

(3) पर्यावरण शिक्षण : काळाची गरज

(4) शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय. 7



http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com